# पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,
पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३,
दूरध्वनी क्रमांक ०२५३-२३०९७००, E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


## प्रेसनोट

दिनांक:- १७/०६/२०२४

राज्य पोलीस दलात पोलीस भरती प्रक्रिया राबवली जात असून, नाशिक ग्रामीण पोलीस दलात ३२ पोलीस शिपाई पदांकरीता भरती होणार आहे. त्यासाठी अर्ज पडताळणी पुर्ण झाली असून, ०३ हजार २२५ उमेदवारांचे अर्ज आले आहेत. सदर भरती प्रक्रियेत मैदानी चाचणीसाठी उमेदवारांचे स्लॉट करण्यात आले आहेत. १९/०६/२०२४ ते २२/०६/२०२४ दरम्यान आडगाव येथील नाशिक ग्रामीण पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर उमेदवारांची मैदानी चाचणी होणार आहे. त्यासंदर्भात वेळापत्रक जाहीर झाले असून उमेदवारांनाही कळवण्यात आले आहे.

**पोलीस शिपाई पदासाठी अर्ज**

| | |
|---|---|
| एकुण प्राप्त अर्ज | ३२२५ |
| पुरूष | २६०२ |
| महिला | ५७६ |
| माजी सैनिक | ४२ |
| माजी सैनिकांवर अवलंबित | ५ |

**मैदानी चाचणी**

१) छाती व उंची
२) १०० मीटर धावणे
३) १६०० मीटर धावणे (पुरूष)
४) ८०० मीटर धावणे (महिला)
५) गोळा फेक

दि. १९/०६/२०२४ ते २२/०६/२०२४ रोजीपर्यंत मुळ शैक्षणिक कागदपत्रे पडताळणी, शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणीसाठी वेळापत्रकाप्रमाणे नमुद केलेल्या दिनांक व वेळेनुसार उमेदवारांना हजर राहणेबाबत प्रवेशपत्र निर्गमित करण्यात आले आहे. उमेदवारांना मुळ कागदपत्रे व कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतिचा संच, चार पासपोर्ट साईज फोटो, आवेदन अर्जाची छायांकित प्रत व प्रवेशपत्र घेवुन उपस्थित राहणेबाबत प्रवेशपत्रामध्ये स्पष्ट सुचना देण्यात आलेल्या आहे.

पोलीस भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवारांना खालील प्रमाणे अधिक सुचना देण्यात येत आहे.

१) जर पावसामुळे एखादे दिवशी मैदानी चाचणी होवू शकली नाही तर त्यांना पुढची सुयोग्य तारीख दिली जाईल

२) काही उमेदवारांना वेगवेगळया पदांकरीता एकापेक्षा जास्त ठिकाणी आणि एकच दिवशी मैदानी चाचणी करीता हजर राहण्याची सुचना प्राप्त झाली असेल अशा उमेदवारांना दुसरी तारीख दिली जाईल.

३) काही उमेदवारांना इतर अडचणी असल्यास त्याचे निरसन स्थानिक पातळीवर केले जाईल.